मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण तसेच मा.उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये प्राप्त होणाऱ्या आदेश तसेच नोटिशीं वर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः न्यायाप्र-२०१५/प्र.क्र.८४/सेवा-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
तारीख: २५ ऑक्टोबर, २०१६

**शासन परिपत्रक :**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील निरनिराळया कार्यालयांमध्ये मोठया प्रमाणात अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींची प्रकरणे मोठया प्रमाणात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे शासन आदेशार्थ/निर्णयार्थ पाठविण्यात येतात. त्यास अनुसरुन अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे अनेक अर्ज दाखल होत असतात व त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागास प्रतिवादी करण्यात येते. अशा प्रकरणांमध्ये मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांनी दिलेल्या प्रत्येक आदेशाबाबत विहित कार्यवाही तात्काळ होणे आवश्यक असते. (आदेशावर अपील दाखल करण्याची आवश्यकता असल्याचा निर्णय घेणे, (विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार) सदर आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक ठरते.) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांनी दिलेल्या आदेशाची विहित कालावधीत पूर्तता न झाल्यास, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर अवमान याचिका दाखल होण्याचे प्रसंग उद्भवतात. ही बाब निश्चितपणे उचित ठरत नाही. असे प्रसंग भविष्यात उद्भवू नयेत म्हणून या संदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१. सेवाविषयक नियमांची अंमलबजावणी करताना क्षेत्रीय स्तरावर होणाऱ्या अनियमितता टाळण्यासाठी शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१९०/सेवा-४, **दिनांक २२ सप्टेंबर, २०१६** अन्वये विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांना सर्व समावेशक सूचना देण्यात आल्या असून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

२. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांनी दिलेले आदेश विभागात प्राप्त झाल्यानंतर, नोंदणी शाखेने हे आदेश तात्काळ संबंधित सह सचिव/उप सचिव यांच्या निदर्शनास आणावेत.

३. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशाची छाननी करुन त्यावर विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानंतर अपील दाखल करणे अथवा आदेशाची अंमलबजावणी करणे

याबाबत कार्यवाही करणेत यावी. जर न्यायालयीन मूळ अर्जात (O.A.) अन्य विभागाला "Respondent" म्हणून दाखविणे आवश्यक असल्यास Review Petition दाखल करुन याबाबत कार्यवाही करावी.

४. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाची प्रकरणे हाताळताना आदेशाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने आदेशाशी संबंधित कार्यासनाने प्रकरणांची विनाविलंब छाननी करुन जास्तीत जास्त दुसऱ्या दिवसापर्यत वरिष्ठ स्तरावर नस्ती सादर करुन प्रकरणाची तातडी त्यांच्या निदर्शनास आणावी.

५. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशाची पूर्तता करण्यास अधिक कालावधी लागणार असल्यास त्या कारणांची नोंद करुन तसेच सदर प्रकरणातील टप्प्यांची यादी करुन सदर प्रकरणी मुदतवाढ मिळण्याकरिता, प्रकरण सध्या कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे त्या संपूर्ण तपशिलासह मुख्य सादरकर्ता अधिकारी यांच्यामार्फत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांना विनंती अर्ज सादर करावा.

६. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत तसेच विलंब होत असल्यास विलंबाबाबत वेळोवेळी इतर संबंधित कार्यालयास तसेच अपील कर्त्यास तपशिलासह अवगत करण्यात यावे.

७. मा.न्यायाधिकरणाची प्रकरणे हाताळताना अधिक काळजी घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक कार्यासनाने या प्रकरणासाठी स्वतंत्र नोदवही ठेवणेबाबत मा.न्यायाधिकरणाने मार्गदर्शन केले आहे. विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने संबंधित प्रकरणाची तात्काळ छाननी करुन प्रकरणाची टिपणी शिफारशींसह सादर करावी.

८. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्या आदेशाची पूर्तता करण्याकरिता क्षेत्रीय कार्यालयाकडून माहिती/प्रस्ताव आवश्यक असल्यास, अशी माहिती/प्रस्ताव कालमर्यादेत प्राप्त करुन घ्यावा. तसेच, सदर माहिती/प्रस्ताव मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशाची पूर्तता विहित कालावधीत करण्याकरिता आवश्यक असल्याचे क्षेत्रीय कार्यालयाच्या स्पष्टपणे निदर्शनास आणावे व जोपर्यत न्यायालयीन प्रकरणाबाबत योग्य ती कार्यवाही पूर्ण होत नाही तोपर्यत न्यायालयीन प्रकरण हाताळण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याने/कर्मचाऱ्याने कार्यालय सोडू नये. न्यायालयीन प्रकरणाची माहिती मिळण्यास विलंब होवून अवमान याचिका दाखल झाल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची नावे अवमान याचिकेमध्ये समाविष्ट करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

९. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांशी संबंधित कामगार/ दिवाणी/औद्योगिक न्यायालये/महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण/उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी परिमंडळ स्तरावर कार्यकारी अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात यावी. संबंधित कार्यकारी अभियंता यांनी सदरहू न्यायालयीन प्रकरणी दरमहा नियमित आढावा घ्यावा. अशी प्रकरणे निकाली काढण्याकरिता संबंधीत कार्यकारी अभियंता हे जबाबदार राहतील.

१०. अशा प्रकरणी अन्य मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय घेणे नियमानुसार बंधनकारक असल्यास, संबंधित नस्ती प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांच्या मान्यतेने त्या विभागाकडे अनौपचारिक संदर्भाद्वारे तात्काळ सादर करावी. मा.न्यायाधिकरणाच्या आदेशाची पूर्तता करणे बंधनकारक असल्याचे संबंधित विभागाच्या निदर्शनास आणावे. त्यामध्ये मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशाचा संदर्भ देऊन सदर आदेशाची पूर्तता विहित कालावधीत करण्याकरिता समयमर्यादेत अभिप्राय देण्याची विनंती त्या विभागास करावी. तसेच, अशा प्रकरणांचा पाठपुरावा करुन अन्य विभागांचे अभिप्राय प्राप्त करुन घ्यावेत. इतर विभागाचे अभिप्राय घेणे नियमानुसार बंधनकारक असल्याचे अर्जदारास तात्काळ कळवावे.

११. अशी प्रकरणे विनाविलंब आवश्यकतेनुसार शासन मान्यतेस्तव सादर करुन मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतचे आदेश निर्गमित करावेत व आदेशाची पूर्तता करण्यात आल्याचे, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या व अर्जदाराच्या निदर्शनास आणण्याची विनंती, मुख्य सादरकर्ता अधिकारी यांना करावी.

१२. वरीलप्रमाणे कार्यवाही केली जात नसल्याने मा.न्यायाधिकरणाच्या आदेशाचे विहित कालमर्यादेत पालन करणे शक्य होत नाही व त्यामुळे याचिकाकर्त्याकडून अवमान नोटिस प्राप्त होतात. सदर नोटिशीस तात्काळ उत्तर देण्यात यावे. मा.न्यायाधिकरणाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता काय कार्यवाही करण्यात येत आहे अथवा अपील दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे याबाबत उपरोक्त उत्तरात स्वयंस्पष्ट माहिती व वस्तुस्थिती अर्जदारास कळविण्यात यावी.

१३. सदर कार्यपध्दतीचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन केले नसल्याचे निदर्शनास आल्यास **जबाबदार अधिकाऱ्याचे नाव अवमान याचिकेमध्ये जोडण्यात येईल**. यासंदर्भातील सर्व जबाबदारी व्यक्तिगतरित्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची राहील व संबंधित अवमान याचिकेबाबत शासनाकडून कोणतीही मदत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना मिळणार नाही. तसेच याबाबत गंभीर दखल घेवून संबंधितावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल याची सर्व संबंधितांनी नोद घ्यावी.

वरील निदेश हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय (खुद्द) तसेच विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(प्रकाश सुरवसे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
(मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती),

२) मुख्य अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई,

३) मुख्य अभियंता,विशेष प्रकल्प, मुंबई,

४) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,

५) मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, नवी मुंबई,

६) उप सचिव (सेवा)/उप सचिव तथा आ.वि.स./उप सचिव (रस्ते)/उप सचिव (खा.र.-१)/ उप सचिव (खा.र.-२)/उप सचिव (रा.म.)/उप सचिव (इमा.)/सर्व अवर सचिव/सर्व कक्ष अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,

७) सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,

८) सर्व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई,

९) संचालक, उपवने व उद्याने, मुंबई.

१०) कार्यासन (सेवा-४), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई (निवडनस्ती)